पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address:** SP Office,Gadchiroli
**E-mail :** prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

*दिनांक- ३०/११/२०१९*

## सायबर पोलीस ठाणे गडचिरोली यांनी घेतला हरविलेल्या २०३ मोबाईलचा शोध

- मा. पोलीस उपमहानिरीक्षक सा. यांचे हस्ते मोबाईलचे वाटप.

आज दिनांक ३०/११/२०१९ रोजी सायबर पोलीस ठाणे गडचिरोली येथे हरविलेले मोबाईल परत करण्याचा कार्यक्रम, मा. श्री. महादेव तांबडे सा. (भा.पो.से.) पोलीस उपमहानिरीक्षक, नागपुर परिक्षेत्र गडचिरोली, मा. शैलेश बलकवडे सा. (भा.पो.से.) पोलीस अधीक्षक गडचिरोली, मा. डॉ. मोहित कुमार गर्ग सा. (भा.पो.से.) अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन) गडचिरोली, मा. अजय कूमार बन्सल सा. (भा.पो.से.) अपर पोलीस अधीक्षक (अभियान) गडचिरोली, यांचे उपस्थितीत पार पडला असुन सदरप्रसंगी मा. पोलीस उपमहानिरीक्षक यांचे हस्ते हरविलेल्या २२ मोबाईलचे वाटप करण्यात आले.

सायबर पोलीस ठाणे गडचिरोली यांचेकडे वर्षभरात मोबाईल हरविल्याचे ३६५ तक्रार अर्ज प्राप्त झाले होते. गडचिरोलीचे पोलीस अधीक्षक मा. श्री. शैलेश बलकवडे यांचे मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस ठाणे गडचिरोलीच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी २०३ मोबाईलचा शोध लावण्यात यश मिळविले आहे.

कॉलेजच्या तरुण- तरूणींपासुन तर गृहीणींपर्यंत मोबाईल वापरणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. याचाच फायदा घेत भुरटे चोर ॲन्ड्राईड मोबाईलधारकांचा पाठलाग करत गर्दीचे ठिकाण, आठवडी बाजार, यात्रा, अशा ठिकाणांवरुन चोऱ्या करतात. तसेच धकाधकीच्या जीवनामुळे व विसरभोळेपणामुळे मोबाईलधारक कुठेही आपले मोबाईल विसरून जातात. मग असे मोबाईल मिळणे आव्हानात्मक असते. अशा वेळी नागरिकांच्या मदतीसाठी सायबर पोलीस ठाण्याशिवाय कुठलाही पर्याय राहत नाही.

गडचिरोली येथील सायबर पोलीस ठाणे सायबर गुन्ह्याविषयी तत्पर असुन, आतापर्यंत अनेक सायबर गुन्हे निकाली काढले आहेत. अश्लिल मेसेज पाठविणे, फेसबुकवर आक्षेपार्ह पोस्ट टाकणे, फेसबुक डाटा करप्ट करणे, पैशाचा अपहार करण्यासाठी बँकेचे वरीष्ठ अधिकारी आहे असे सांगुन प्रलोभणात्मक मेसेज पाठविणे. अशा विविध सायबर गुन्ह्याचा शोध सायबर पोलीस ठाणे गडचिरोली यांनी घेतला आहे. त्यामुळे सायबर गुन्हे करणाऱ्या आरोपींवर आता लगाम लागला आहे. ज्या मोबाईलधारकांचे आज मोबाईल परत देण्यात आले त्यांनी गडचिरोली पोलीस दलाचे आभार मानले आहे.

सायबर पोलीस ठाणे यांचे कामगिरीचे मा. महादेव तांबडे सा. (भा.पो.से.) पोलीस उपमहानिरीक्षक नागपूर परिक्षेत्र गडचिरोली, मा. शैलेश बलकवडे सा. (भा.पो.से.) पोलीस अधीक्षक गडचिरोली, यांनी कौतुक केले आहे. त्याचबरोबर जिल्हाभरातील नागरिकांना आवाहन केले आहे कि, सायबर गुन्हयाविषयी तसेच मोबाईल चोरी, मोबाईल गहाळ होण्याबद्दल जर आपल्या काही तक्रारी असतील तर आपण त्या सायबर पोलीस ठाणे येथे नोंदवाव्यात.




